विषयः- “सहकार कायदा सुधारणेनुसार लेखा परीक्षण कार्यशाळा दि.10/6/2017 करीता टिपण-

अ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,1960 मध्ये महा. अधि. क्र. 16/2013 दि. 13/8/2013 ने केलेल्या सुधरणांनुसार करावयाचे लेखापरीक्षण

I) कलम -81

1) कलम 81 (1) (ए) नुसार संस्था त्यांच्या कलम 75 नुसारच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (समिती / उपसमिती सभा नव्हे) प्रतिवर्ष शासन मान्य पॅनल वरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करेल व आर्थिक वर्ष समाप्तिपासुन 4 महिन्याच्या आंत संस्थेचे लेखापरीक्षण करुन घेईल. असा लेखा परीक्षक नियुक्तीचा ठराव व लेखापरीक्षकाचे संमत्ती पत्र यांचे विवरणपत्र संस्था वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांकापासुन 1 महिन्याच्या आंत निबंधकास कलम 75 व 79 नुसार सादर करील. अशाप्रकारचे विवरणपत्र संस्थेने निबंधकाकडे दाखल न केल्यास कलम 81 (1) (ए) च्या पहील्या परंतुकानुसार निबंधक लेखी कारणे नमुद करुन शासन मान्य पॅनल वरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करेल.

शासन मान्य पॅनल वरील लेखापरीक्षक रु. 1 लाखापेक्षा कमी वसुल भागभांडवल असलेल्या संस्था वगळता कमाल 20 संस्थांचे प्रतिवर्ष लेखापरीक्षण करु शकतील. संघीय संस्थांचा लेखापरीक्षण अहवाल निबंधक राज्य विधीमंडळास सादर करतील.

2) लेखापरीक्षक कलम 81 (1) (इ) नुसार लेखापरीक्षण अहवालात खालिल बाबी नमुद करेल-

- लेखापरीक्षणात आढळुन आलेले सर्व दोष, अनियमितता यांचा तपशिल लेखापरीक्षण अहवालात असेल.
- जर आर्थिक अनियमितता, अपहार किंवा अफरातफर असल्यास लेखा परीक्षक त्याचा तपास करुन त्याची गुन्हेगारी पध्दत, जबाबदारी व अंतर्भुत रक्कम यांचा तपशिल लेखापरीक्षण अहवालात असेल.
- लेखा विषयक अनियमितता व त्यांचे आर्थिक विवरण पत्रांवर व नफा - तोटा पत्रकावर दुष्प्रभाव यांचा तपशिल लेखापरीक्षण अहवालात असेल.
- संस्थेच्या समिती / उप समिती कामकाजाची तपासणी करुन त्यात अनियमितता व उल्लंघने आढळल्यास त्यास जबादारांसहचा तपशिल लेखापरीक्षण अहवालात असेल.

3) कलम 81 (1) च्या स्पष्टीकरण - 1 नुसार पॅनलवरील लेखापरीक्षकांचे प्रकारानुसार त्यांची शेक्षणिक व अनुभव पात्रता तरतुद केली आहे.

लेखा परीक्ष्क प्रकार	शेक्षणिक पात्रता	अनुभव
सनदी लेखापाल फर्म	सी.ए.	-
सनदी लेखापाल	सी.ए.	1 वर्ष
प्रमाणित लेखापरीक्षक	पदवीधर व जी.डी.सी.ए	3 वर्ष
शासकीय लेखापरीक्षक	जी.डी.सी.ए	परीविक्षाधीन कालावधी पुर्ण

4) लेखापरीक्षकाने कलम 81 (2) नुसार शासनाने अधिसुचित केलेल्या “लेखापरीक्षण मानकांनुसार” (Auditing Standards) लेखापरीक्षण करावयाचे आहे. ह्याशिवाय लेखापरीक्षकाने पुर्वीप्रमाणेच कलम 81 (2) नुसारच्या 9 मुद्द्यांची परीक्षा किंवा पडताळणी करावयाची आहे.

5) कलम 81 (3) (ए) नुसार लेखापरीक्षणासाठी संस्था दप्तर, लेखे, कागदपत्रे, सुरक्षापत्रे, रोख, मत्ता, इ. तपासण्याचा अधिकार लेखापरीक्षकास राहील. अशा

तपासण्याच्या बाबी ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेत आहे त्यास संस्था मुख्यालयात ती तपासण्यासाठी बोलविण्याचा अधिकार अधिकार लेखापरीक्षकास राहील.

6) कलम 81 (3) (सी) नुसार लेखापरीक्षण अहवाल संस्थेच्या लेख्यांचे सत्य व योग्य चित्र प्रतिबिंबीत करीत नसेल तर अशी बाब निबंधकांच्या निदर्शनास आल्यास निबंधक कलम 81 (1) च्या स्पष्टीकरण - 1 नुसार (कारण हे स्पष्टिकरण केवळ कलम 81 (1) करीता नव्हे तर संपुर्ण कलम 81 करीता आहे) शासन मान्य पॅनलवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करुन 'चांचणी लेखापरीक्षण' करुन घेईल. सदर आदेशात निबंधक चांचणी लेखापरीक्षणाच्या बाबी नमुद करेल.

7) कलम 81 (5 बी) नुसार -

- लेखापरीक्षक कोणत्याही परीस्थितीत लेखा परीक्षण अहवाल लेखा परीक्षण पुर्ण केल्याच्या दिनांकापासुन 30 दिवसांत पण वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटिस निर्गमनाच्या दिनांकापुर्वी देईल.
- लेखापरीक्षण अहवालात लेखा परीक्षक संस्था लेख्यासंबंधी गुन्ह्याच्या किंवा अन्य गुन्ह्याच्या निष्कर्षास आल्यास लेखा परीक्षण अहवाल दिल्याच्या दिनांकापासुन 15 दिवसांत त्याचा "विशिष्ट अहवाल" (Specific Report) निबंधकास सादर करील.
- लेखापरीक्षक निबंधक अनुमती प्राप्त नंतर त्या गुन्ह्याचा प्राथमिक माहिती अहवाल (F.I.R.) दाखल करील. लेखापरीक्षकाने प्राथमिक माहिती अहवाल (F.I.R.) दाखल न केल्यास त्याचे नांव पॅनलवरुन काढुन टाकण्यात येईल किंवा निबंधक त्याचेविरुध्द अन्य कारवाई करतील.
- वरील प्रमाणे लेखा परीक्षकाने गुन्हा दाखल न केलेल्या प्रकरणी निबंधक अन्य व्यक्तीस प्राधिकृत करुन त्या गुन्ह्याचा प्राथमिक माहिती अहवाल (F.I.R.) दाखल करवुन घेतील.

- लेखापरीक्षणात आर्थिक अनियमिततांमुळे संस्थेस हानी झाल्याचे आढळुन आल्यास व त्यास समिती सदस्य / अधिकारी / अन्य व्यक्ती जबाबदार असल्याचा लेखापरीक्षकाचा निष्कर्षा असल्यास लेखा परीक्षक लेखा परीक्षण अहवाला सोबतच त्याचा "विशेष अहवाल" (Special Report) निबंधकास सादर करील. लेखापरीक्षकाने "विशेष अहवाल" (Special Report) सादर न केल्यास त्याला निबंधक लेखापरीक्षक म्हणुन नियुक्तीसाठी अपात्र करतील किंवा निबंधक त्याचेविरुध्द अन्य कारवाई करतील.

II) कलम -82

1) संस्था लेखापरीक्षण अहवालाचा "दोष दुरुस्ती अहवाल" निबंधकास सादर करुन पुढिल 'सर्वसाधारण सभे' पुढे मांडेल.

2) निबंधक "दोष दुरुस्ती अहवाल" लक्षात घेऊन संस्था किंवा जबाबदार संस्था अधिका-यास पुढिल कार्यवाही करण्याचे आदेश देईल. त्याकरीता संघिय संस्था सल्लामसलत आवश्यक नाही.

3) संस्थेने लेखापरीक्षण अहवालाचा "दोष दुरुस्ती अहवाल" निबंधकास सादर केला नाही व पुढिल 'सर्वसाधारण सभेस' सादर केला नाही तर सर्व समिती सदस्य कलम 146 च्या गुन्ह्यासाठी व कलम 147 शिक्षेसाठी पात्र राहतील. त्याकरीता मात्र संघिय संस्थेशी सल्लामसलत करेल. पण 45 दिवसांत सल्लामसलत देण्याचे संघिय संस्थेवर बंधन राहील.

4) निबंधक वा त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती "दोष दुरुस्ती अहवाल" चाननी (Scrutiny) करुन प्राप्ती दिनांकापासुन 6 महिन्यात त्याचा अहवाल संस्थेस कळविल.

5) लेखापरीक्षण अहवालाचा “दोष दुरुस्ती अहवाल” यांवर लेखापरीक्षक शेरे नमुद करुन संपुर्ण बाबनिहाय दोष दुरुस्ती पुर्ण होईपर्यंत निबंधकास त्याचा अहवाल सादर करण्याची जबाबदारी लेखापरीक्षकाची राहिल.

<u>ब) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,1961 मध्ये करावयाच्या सुधारणांचे प्रारुप अधिसुचना दि. 22/11/2013 ने प्रकाशित झाले आहे त्या सुधारणांनुसार (व तदनंतर प्रस्तावित सुधारणांनुसार) करावयाचे लेखापरीक्षण</u>

1) नियम 69 (1) (ए) नुसार लेखापरीक्षण म्हणजे चांचणी / फेर / परिव्यय / विशेष / परफारमन्स असे सर्वप्रकारचे लेखापरीक्षण समाविष्ट केले आहे.

2) नियम 69 (1) (बी) नुसार लेखापरीक्षण अहवालाचा भाग - अ, आर्थिक पत्रके व लेखापरीक्षकाचे प्रमाणपत्र खात्याच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याची तरतुद आहे.

3) नियम 69 (1) (सी) नुसार संघीय संस्थेचे लेखापरीक्षण अहवाल मराठी व इंग्रजीत (सी.डी सह) देण्याची तरतुद आहे.

4) नियम 69 (1) (एफ) नुसार लेखा परीक्षक पॅनल जतन करण्याची तरतुद आहे. लेखा परीक्षकांचे 3 वर्ग व संस्थांचे 3 प्रकारात लेखा परीक्षक नियुक्ती करीता वर्गीकरण केले आहे.

5) नियम 69 (1) (जी) नुसार लेखा परीक्षकास पॅनल वरुन काढुन टाकण्याचे निकष विहित केले आहेत.

6) नियम 69 (3) नुसार -

- लेखा परीक्षकाने द्यावयाचे लेखा परीक्षण प्रमाणपत्र बॅकांकरीता “N-1” नमुन्यात व इतर संस्थांकरीता “N-2” विहित केले आहे.

- लेखापरीक्षकाने संस्थेने स्वीकारलेले लेखांकन धोरण शासनाने किंवा ICAI ने विहीत केलेल्या “लेखांकन मानकानुसार” (Accounting Standards) आहेत किंवा कसे त्याबाबत अभिप्राय द्यावयाचे आहेत.
- आर्थिक पत्रके सत्य व योग्य चित्र प्रतिबिंबीत करतात किंवा कसे त्याबाबत अभिप्राय द्यावयाचे आहेत.
- नफा - तोटा प्रमाणित करतांना विविध तरतुदींच्या (जसे एनपीए, थकित व्याज निधी, घसारा, इतर खर्च विषयक तरतुदी) तुटीमुळे नफा - तोट्यावर होणारा परिणाम नमुद करुन संस्था नफ्यात आहे की तोट्यात लेखापरीक्षकाने नमुद करणे आवश्यक आहे.

7) नियम 69 (4) (iv) नुसार लेखापरीक्षकाने संस्थेने स्वीकारलेले लेखांकन धोरण शासनाने किंवा ICAI ने विहीत केलेल्या “लेखांकन मानकानुसार” (Accounting Standards) आहेत किंवा कसे व त्याचा संस्थेच्या लेखे व आर्थिक स्थितीवर कोणताही दुष्प्रभाव होत नसल्याबाबत अभिप्राय द्यावयाचे आहेत.